दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र ● बुधवार दि.२७ नोव्हेंबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-९३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## घरी बसणार नाही,राज्यभर फिरणार !

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरघोस यश मिळालं आहे. महायुतीला अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळालं असताना महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला आहे. महायुतीला २३४ जागा मिळाल्या असून, भाजपाला १३२, शिवसेना ५७ आणि राष्ट्रवादी ४१ जागा जिंकली आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीला फक्त ५० जागा मिळाल्या असून,उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला फक्त २० जागा मिळाल्या आहेत.तर काँग्रेसला १६ आणि राष्ट्रवादीला १० जागा जिंकता आल्या. दरम्यान शरद पवारांनी साताऱ्यात पत्रकार परिषद घेत त्यांनी या निकालावर भाष्य केलं आहे.आमची जी अपेक्षा होती तसा निकाल नाही.पण शेवटी लोकांनी दिलेला निर्णय आहे.त्याचा अभ्यास करणं,कारणीमांसा करणं याची गरज आहे.नव्या उत्साहाने लोकांमध्ये जाऊन उभं राहावं लागेल, असं शरद पवार म्हणाले आहेत. महायुतीला लाडकी बहीण योजनेचा फायदा झाला का?असं विचारलं असता शरद पवार म्हणाले की,आम्ही लोकांकडून,कार्यकर्त्यांकडून जी माहिती घेतली त्यातून हे एक महत्त्वाचं कारण आहे असं ऐकायला मिळत आहे.

## लाडक्या बहिणींनी वर्षा निवासस्थानी एकनाथ शिंदेंचे केले औक्षण

# लाडक्या बहिणींनी एवढा मोठा चमत्कार केला,आश्वासन पूर्ण करणार-एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)–एकनाथ शिंदे यांचे औक्षण करण्यासाठी लाडक्या बहिणी मोठ्या संख्येने वर्षा निवासस्थानी पोहोचल्या. यावेळी लाडक्या बहिणींनी एकनाथ शिंदे यांचे औक्षण केले. तसेच, त्यांचे अभिनंदनही केले. तसेच, यावेळी लाडक्या भावाचा विजय असो, अशी घोषणाबाजीही लाडक्या बहिणींकडून करण्यात आली. त्यासोबतच एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींचे आभार मानले असून दिलेले आश्वासन पूर्ण करणार असल्याचाही शब्द लाडक्या बहिणींना दिला आहे. यावेळी निलम गोऱ्हे यांनी पुढचे पाच वर्ष एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री झाले पाहिजेत, अशी इच्छा व्यक्त केली.**



हा लाडका भाऊ कायम तुमच्या पाठीशी उभा असल्याचेही शिंदे म्हणाले. माझ्या लाडक्या बहिणींच्या परिवाराला काहीतरी हातभार लागला पाहिजे. म्हणूनच आम्ही ही योजना सुरू केली. तीन सिलेंडर मोफत देण्याचा निर्णयही आम्ही त्यासाठीच घेतला. म्हणून आपण म्हणतो की हे सरकार सर्वसामान्यांचं आहे, गरिबांचं आहे. काँग्रेस म्हणाले की, गरीबी हटावो, एकीकडे गरीब हटला पण गरिबी हटली नसल्याचा हल्लाबोलही शिंदेंनी काँग्रेसवर केला.तसेच, लाडकी बहीण योजनेचे दिलेले एकवीसशे रुपयाचे आश्वासनही पूर्ण करणार असल्याचा शब्द त्यांनी लाडक्या बहिणींना दिला. डम्पिंग मेजॉरिटी येईल असे मी सांगत होतो. पण तुम्ही लाडक्या बहिणींनी विरोधकांना डम्पिंगमध्ये टाकल्याचा टोलाही त्यांना विरोधकांना लगावला.

तुम्ही आज मला धन्यवाद, औक्षण आणि शुभेच्छा द्यायला आलात त्याबद्दल मी तुमचा खूप खूप आभारी आहे.आक्रमक बाणा पण तेवढाच जिव्हाळा असलेले अनिल दादा शिंदे म्हणाले- लाडक्या बहिणींचे मी स्वागत करतो. त्यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला. त्याबद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन. लाडक्या बहिणींनी या राज्यात इतिहास घडवला आहे. महायुतीने विकासाचं, कल्याणकारी योजनाचं काम केलं. त्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही सर्वात सुपरहीट झाल्याचेही ते म्हणाले. माझ्या लाडक्या बहिणींमुळे अद्भूत आणि दैदिप्यमान विजय आम्हाला मिळाला आहे. लाडक्या बहिणींनी विरोधकांकडे विरोधी पक्षनेतेपद सुद्धा शिल्लक ठेवलं नाही. राज्यात लाडक्या बहीणींची लाट निर्माण झाली आणि या लाटेत विरोधी पक्ष वाहून गेला. हा चमत्कार लाडक्या बहिणींनी केला. त्यामुळेच तुम्ही आज मला भेटायला, शुभेच्छा द्यायला आलात.

## रांजणी येथे विविध ठिकाणी भारतीय संविधान दिन साजरा



**जालना । असलम कुरेशी**

रांजणी घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथे नागसेन बौद्ध विहार व ग्रामपंचायत कार्यालयात मंगळवारी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय संविधान प्रस्तावना वाचन करण्यात आली. २६ नोव्हेंबर हा स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एक विशेष दिवस आहे. या दिवशी देशभरात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

यावेळी सरपंच अमोलभाऊ देशमुख, उपसरपंच शेख रहिम, ग्रामपंचायत सदस्य दिपक वयखडे, कैलास वरखडे, शिवाजी पाटोळे, सेवानिवृत्त शिक्षक विजयकुमार खुळे, किरण जाधव, अशोक पाटोळे, सिध्दार्थ सराटे आदी उपस्थित होते.

## समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेचा बिपिन मरीन सर्व्हिसेस प्रा.लि.कंपनी सोबत करार संपन्न

**उरण । विठ्ठल ममताबादे**

समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेचा उरण येथे पोलारिस लॉजिस्टिक्स पार्क कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या बिपिन मरीन या सर्व्हेअर कंपनीसोबत करार नुकताच संपन्न झाला. संघटनेचे अध्यक्ष कामगार नेते अतुल परशुराम भगत यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. तसेच बिपिन मरीन तर्फे भूषण हांडे साहेब यांनी स्वाक्षऱ्या केल्या याप्रसंगी पोलारिस लॉजिस्टिक्स पार्क कंपनी प्रशासनातर्फे अरुप घोष, सागर म्हात्रे आदी उपस्थित होते. तसेच कामगार संघटनेतर्फे अजय पाटील, नैनेश म्हात्रे तसेच कामगार प्रतिनिधी म्हणून राकेश भोईर, तुषार पाटील, शक्ती भोईर, निलेश मोडखळकर, लकेश ठाकूर, विशाल ठाकूर, अभिजीत घरत, सुलक्षण ठाकूर



तसेच बिपिन मरीन सर्व्हिसेस तर्फे भूषण हांडे, अक्षय ठाकूर उपस्थित होते .

यावेळी बोलताना अतुल भगत यांनी सांगितले की केंद्रीय कामगार कायद्याप्रमाणे वेतन तसेच कामगारांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी चांगली वैद्यकीय सुविधा या प्रमुख मागण्या आम्ही या करारामध्ये कंपनीकडून मागून घेण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. या करारानुसार तीन वर्षासाठी ९२०० रुपयांची भरगोस वेतन वाढ तसेच एडखउ व्यतिरिक्त प्रत्येक कामगारांना वैद्यकीय मदत म्हणून ५०००, ५५००, ६००० रुपये पुढील तीन वर्षात मिळणार आहेत. भेंडखळ येथे ग्राम विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना दिलेला शब्द या करारावेळी मी पुरा करू शकलो याचा सर्वाधिक आनंद मला होत आहे. यावेळी कामगार प्रतिनिधींचे मिळालेले सहकार्य तसेच सर्व कामगारांचा संघटनेवर असलेला विश्वास यामुळेच हा करार संपन्न होऊ शकला. या पुढील होणारे करार होण्यासाठी सदर झालेला करार महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे ग्रामस्थ मंडळ भेंडखळ, ग्रामविकास आघाडी भेंडखळ तसेच सर्व कामगार प्रतिनिधी, कामगार यांचे या प्रसंगी आभार मानत आहोत.

## भव्य आरोग्य शिबीर व रक्तदान शिबिराचे आयोजन

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण पूर्व विभागात सातत्याने सामाजिक कार्य करणाऱ्या त्याचप्रमाणे सी.एच.ए. (कस्टम हाऊस एजेंट )चे काम करणाऱ्या बांधवांसाठी नेहमी धावून जाणारी व सीएचए बांधवांच्या अडी अडचणीत नेहमी सहभागी होणाऱ्या, त्यांचे सुख दुःख सोडविणाऱ्या न्हावा शेवा सी.एच.ए आधार सामाजिक संस्थेतर्फे रविवार दिनांक १/१२/२०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन, उरण येथे पनवेल हॉस्पिटल (पनवेल )यांच्या सहकार्याने आरोग्य शिबीर, आर झूनझूनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल तर्फे मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तर तेरणा ब्लड सेंटर तेरणा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल नेरूळ नवी मुंबई यांच्या सहकार्याने भव्य दिव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.




आज नागरिकांना आरोग्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात विविध समस्या भेडसावत असल्यामुळे कमीत कमी वेळेत चांगले सुविधा देऊन नागरिकांचे आरोग्य सुधारण्याचा दृष्टिकोनातून व आरोग्य विषयक जनजागृती करण्याच्या दृष्टीने या भव्य दिव्य अशा आरोग्य शिबिराचे व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा तसेच इच्छुक रक्त दात्यांनी मोठया प्रमाणात रक्तदान करावे असे आवाहन न्हावा शेवा सीएचए आधार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश भगत यांनी जनतेला केले आहे.नागरिकांनी येताना आपले सर्व जुने रिपोर्ट तसेच आधार कार्ड, पिवळे /केसरी रेशन कार्ड सोबत आणावे असेही आवाहन त्यांनी जनतेला केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा -

रुपेश भगत फोन नंबर - ९६१९३९५२९२,
हनुमान म्हात्रे - ९८६७८८६४८०
श्याम गावंड - ९६६४०३४३४७
सुरेंद्र म्हात्रे - ८८७९६१०१०५,
किरण म्हात्रे - ९९३०३१३५५४,
दिपक गावंड - ७७३८७७९८८९,
संपेश पाटील - ७७३८०९९०६१,
दिनेश पाटील - ७७१८०४९७७५

## भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा



**गंगापूर । प्रा.संजय तुपे**

गंगापूर येथील मॉडर्न इंटरनॅशनल सी बी एस ई स्कूल येथे भारतीय संविधान दिनाचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी शाळेच्या अध्यक्षा श्रीमती बिंदू मॅडम यांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा पूजन करून संविधान चे पूजन करून उद्देशिकेचे वाचन करण्यात आले, याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कविता गवते, शाळेचे कॉर्डिनेटर प्रा संजय तुपे, शिक्षक वृंद विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमात २६/११ मुंबई हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली त्याचबरोबर शिक्षकांचे मार्गदर्शन पर भाषण झाले, विद्यार्थ्यांची नाटिका, निबंध स्पर्धा,भाषण स्पर्धा, अशा विविध स्पर्धांचे आयोजन करून हा कार्यक्रम संपन्न झाला.

## लोकशाही दिनाचे २ डिसेंबर रोजी आयोजन

**जालना । असलम कुरेशी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याच्या पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. जिल्ह्यात दि. २ डिसेंबर २०२४ सोमवार रोजी सकाळी ठिक १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देतांना त्यांनी संबंधित तालूक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही



कार्यवाही झाली नाही अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. तसेच ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी कळविले आहे. कोणत्याही स्तरावर लोकशाही दिनात खालील बाबींशी संबंधित अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तसलीदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदती व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज http: jalna.mic.in या संकेस्थळावर उपलब्ध असल्याचे उपजिल्हाधिकारी (सामान्य) नम्रता चाटे यांनी कळविले आहे.

## राज्यघटनेमध्ये १४० कोटी नागरिकांना एकत्र करण्याची ताकत-डॉ.साबळे

**सिल्लोड । प्रतिनिधी**

देशातील राज्यघटना मध्ये स्वातंत्र्य, समता,बंधुता आणि समन्याय हा भारतीय राज्यघटनेचा आत्मा असून राज्यघटनेमध्ये देशातील १४० कोटी नागरिकांना एकत्र करण्याची ताकत असल्याचे प्रतिपादन डॉ.सचिन साबळे यांनी केले आहे.

२६ नोव्हेंबर रोजी भारताच्या राज्यघटना निर्मितीला ७५ वर्ष पूर्ण होत असून भारतीय संविधान दिनानिमित्त शहरातील मातोश्री गयाबाई साबळे सामाजिक प्रतिष्ठान, अण्णाभाऊ साठे युवा मंचच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला.प्रारंभी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, यांच्या प्रतिमेस पुष्पहार वाहून अभिवादन करण्यात आले .यावेळी भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले.याप्रसंगी संचालक डॉ. सचिन साबळे, पंडित आव्हाड, प्रा अनिल साबळे, भगवान राऊत, प्रशांत साबळे, संतोष थोरात, गजानन आव्हाड, सचिन आव्हाड, नितीन कांबळे , बापू आव्हाड,शुभम आव्हाड, अंजली साबळे , राधा यंगड, कमल आव्हाड, स्नेहल साबळे, शिल्पा आव्हाड, माहेश्वरी साबळे, संगीता आव्हाड, शितल आव्हाड,प्रमिला आव्हाड, प्रीती साबळे, राणी आव्हाड, श्रुती साबळे, प्रियंका गायकवाड यांच्यासह वाचकांची उपस्थिती होती.

संपादकीय

# मालदीवला भारताचाच पर्याय

मालदीवचे अध्यक्ष महंमद मुइज्जू यांनी नुकताच भारत दौरा केला. या दौऱ्यात मुइज्जू यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक नेते, उद्योगपतींच्या गाठीभेटी घेतल्या. आर्थिक संकटात अडकलेल्या मालदीवला कर्जबाजारी होण्यापासून वाचवण्यासाठी भारताकडून मदतीचा हात मिळेल, अशी त्यांची अपेक्षा आहे. चीनने कर्जाच्या परतफेडीसाठी पाच वर्षांचा कालावधी वाढवून देण्यास सहमती दर्शविली असली, तरी अद्याप चीनकडून मालदीवला कोणतीही वित्तीय मदत मिळालेली नाही. त्यामुळे आता मालदीवला भारताशिवाय पर्याय उरलेला नसल्याने भारताशी वैर घेणे परवडणारे नसल्याची जाणीव मुइज्जू यांना झाली आहे.काही महिन्यांपूर्वीच मालदीवमध्ये निवडणुकीत महंमद मुइज्जू यांचा विजय झाला. भारताचा विरोध आणि चीनशी जवळीक असलेले नेते, ही त्यांची ओळख आहे. तेथील निवडणुकीतही हे चित्र दिसून आले. निवडणुकीच्या काळात मुइज्जू यांनी 'भारत हटाओ'चा प्रचार केला. मालदीववरील भारताचा प्रभाव कमी करण्याचे आश्वासनही त्यांनी मालदीवच्या मतदारांना दिले होते.'मालदीवच्या केंद्रीय बँकेने परकीय चलनसाठा वाढवण्यासाठी ४० कोटी डॉलरच्या परकीय चलनाचा व्यवहार करावा,' असे मुइज्जू यांना वाटत आहे. मात्र, 'मूडीज' या पतमानांकन संस्थेने मालदीवच्या आर्थिक स्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. मूडीजच्या मते मालदीवचा परकीय चलनसाठा त्यांच्या परदेशी कर्जापेक्षा खूपच खाली आला आहे. जो सन २०२५मध्ये जवळपास ६० कोटी डॉलर आणि २०२६मध्ये १ अब्ज डॉलर इतका असेल. मालदीववर सार्वजनिक कर्ज जवळपास ८ अब्ज डॉलर इतके आहे. ज्यात भारत आणि चीनचे प्रत्येकी सुमारे १.४ अब्ज डॉलरच्या कर्जाचा समावेश आहे.

अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतरही मुइज्जू यांनी सगळ्यात आधी तुर्की आणि चीनला भेट दिली. मात्र, भारताला भेट देणे टाळले होते. त्यांच्या बीजिंगच्या भेटीवेळी मालदीवच्या उच्चपदस्थांनी भारताचा अवमान करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. त्यांच्या तीन उपमंत्र्यांनी मोदींना 'विदूषक', 'दहशतवादी' आणि 'इस्रायलच्या तालावर नाचणारे' म्हटले होते. यानंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली आणि सरकारसह देशातील जनतेने चालू केलेल्या 'बॅन मालदीव' मोहिमेने इतका जोर धरला की, भारतातून मालदीवला जाणाऱ्या सहली, चित्रपटांचे चित्रीकरण, याबरोबर अनेक अभिनेते, अभिनेत्री आणि नागरिकांनीही मालदीवकडे पाठ फिरवली. यात पंतप्रधान मोदी यांनी लक्षद्वीपला भेट दिल्यानंतर तेथील पर्यटनामध्ये मोठी वाढ होऊन मालदीवला पर्याय पुढे आला. भारतीय पर्यटकांवर चालणारा तेथील पर्यटन व्यवसाय आणि त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मिळणारा पैसा या बहिष्कारानंतर आटू लागला. त्यानंतर या तीन मंत्र्यांची मुइज्जू सरकारने हकालपट्टी केली खरी; परंतू अजूनही त्यांचा पर्यटन व्यवसाय सावरलेला नाही.

बिघडलेले संबंध

अनेक काळापासून भारताचा मालदीववर प्रभाव आहे. हिंद महासागरातील भौगोलिक स्थिती पाहता मालदीवच्या माध्यमातून भारताला तेथील मोक्याच्या ठिकाणांची देखरेख करणे सोपे जात होते. मात्र, मुइज्जू अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी चीनशी जवळीक करण्यासाठी मालदीवमधील ८० सैनिक भारताला परत घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर भारताने आपले सैन्य माघारी बोलवत फक्त सैनिकी तांत्रिक कर्मचारी तेथे ठेवण्यास दोन्ही देशांनी तयारी दर्शविली. मुइज्जू सरकारने चीनच्या झियांग यांग हाँग तीन या संशोधक जहाजाला मालदीवच्या बंदरावर येण्याची परवानगी दिली होती. त्यांच्या या निर्णयावर भारताने नाराजीही व्यक्त केली होती. चीनी जहाजे माहिती गोळा करण्याच्या मोहिमेवर असल्याचे काही जणांचे म्हणणे होते. तेव्हापासून दोन्ही देशांमध्ये संबंध ताणले गेले होते.

भारताकडून मदतीची अपेक्षा

मालदीव हा जवळपास बाराशे देश आहे. हिंदी महासागराच्या मधोमध ही बेटे असल्यामुळे त्याचे भौगोलिक स्थानदेखील अत्यंत महत्त्वाचे आहे. मालदीवची लोकसंख्या जवळपास सव्वापाच लाख इतकी आहे, तर भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या घरात आहे. हा छोटासा देश त्यांच्या अन्नधान्य, पायाभूत सुविधा, विकास आणि आरोग्यसेवांसाठी भारतावर अवलंबून आहे. त्यामुळे अन्य कोणी मदतीचा हात देणार नसल्याने भारताला दुखावून चालणार नाही, असा साक्षात्कार चीनधार्जिण्या मुइज्जू यांना झाला असण्याची शक्यता आहे. सध्या आर्थिक संकटात सापडलेल्या मालदीवला कर्जबाजारी होण्यापासून रोखण्यासाठी त्यांना भारताकडूनच मदतीची आपेक्षा आहे. त्यामुळे मुइज्जू यांच्या भारत दौऱ्यात या गोष्टीला सर्वाधिक प्राधान्य आहे. भारताकडून अनुदानाच्या स्वरुपात वित्तीय मदत मिळवण्याचा आणि मालदीवने भारताकडून घेतलेल्या कर्जाची पुनर्रचना करून त्यात सूट मिळविण्याचा मुइज्जू यांचा प्रयत्न किती यशस्वी झाला, याचे उत्तर भविष्यात मिळेल.


संबंध सुधारणे का महत्त्वाचे?

लोकसभेच्या निवडणुकीत नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर त्यांच्या शपथविधी समारंभाला मुइज्जू उपस्थित राहिले होते. त्यानंतर दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये सुधारणा होण्यास सुरुवात झाली आहे. ऑगस्टमध्ये परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या मालदीव भेटीनंतर दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्यास पुन्हा बळ मिळाले. या वेळी 'मालदीव हा भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट पॉलिसी'चा पाया आहे,' असे जयशंकर नमूद केले. सध्याच्या परिस्थितीचा विचार केल्यास दोन्ही देशांतील धोरणात झालेला बदल भारताच्या दृष्टीने सकारात्मकच आहे. कारण अलीकडेच भारताच्या मित्र असलेल्या बांगला देशामध्ये अशांतता आहे. तेथील पंतप्रधानांना देशातून पलायन करावे लागले आहे. बांगलादेशात सत्तेत आलेल्या हंगामी सरकारसोबत सूर जुळण्यास आणखी काही वेळ जाण्याची शक्यता आहे. दुसरीकडे भारताच्या धोरणांवर टीका करणारे के. पी. शर्मा ओली पुन्हा एकदा नेपाळचे पंतप्रधान झाले आहेत. या पार्श्वभूमीवर मालदीवच्या परराष्ट्र धोरणात झालेला बदल भारताच्या दृष्टीने सकारात्मक आणि महत्त्वाचा आहे. मालदीवचे अध्यक्ष महंमद मुइज्जू यांनाही या गोष्टीची जाणीव झाली आहे. भारताला नाराज करणे किंवा विरोध करणे हे मालदीवला परवडणारे नाही. त्यामुळे त्यांच्या धोरणातील हा व्यावहारिक बदल दिसले.चार महिन्यांपूर्वी मोदी सरकारच्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी मुइज्जू भारतात आले होते. मात्र, त्यांचा हा पहिलाच द्विपक्षीय राज्य दौरा होता. या दौऱ्यात मुइज्जू यांनी परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यांच्यासोबत चर्चा केली. या राजकीय भेटीनंतर मुइज्जू व्यावसायिक कार्यक्रमांसाठी मुंबई, बंगळुरूला गेले तेथे त्यांनी व्यावसायिक,उद्योगपती यांच्याही भेटी घेतल्या.या दौऱ्यात मुइज्जू यांच्यासोबत फर्स्ट लेडी साजिधा महंमद भारतात आल्या होत्या. या भेटींची फलनिष्पत्ती काय होणार आणि दोन्ही देशांना यातून काय लाभ होणार, हे लवकरच स्पष्ट होईल.

–संकेत कुलकर्णी

# टाटा आणि डावे

'टाटा', बस नाम ही काफी है! अशिक्षित - सुशिक्षित, आर्थिक-औद्योगिक क्षेत्राचा परिचय असलेली असो वा नसो, शहरी असो की खेड्यात राहणारी, देशातील जवळपास प्रत्येक व्यक्तीने टाटा हे नाव ऐकलेले असते, इतकेच नाही तर त्या नावाबद्दल त्याच्या मनात एक दृढविश्वास व आदर असतो. या नावाचा आदर करा, असे काही कोणी त्यांना सांगायला जात नाही की, हे नाव प्रात:स्मरणीय आहे, असे कोणत्या शिबिरात सांगितले जात नाही. शतकाहून अधिक काळ औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असलेला हा समूह. पोलाद हा धातू अनेक उद्योगांसाठी आवश्यक असतो, त्याचे महत्त्व ओळखून स्वातंत्र्याआधीच टाटांनी जमशेदपूर येथे स्टीलचा कारखाना उभारला होता, तोही देशी भांडवलाच्या आधारे. देशातील अग्रगण्य उद्योगांपैकी असलेले एक उद्योजक घराणे, पण याला घराणे तरी कसे म्हणावे, असा प्रश्न येतो. कारण ज्या मूळ टाटांनी याची स्थापना केली त्यांच्या घराण्यातील कोणी वंशज आज या ग्रुपच्या प्रमुखपदी नाहीत. आदर्श मूल्यांचे कसोशीने पालन करणारा हा समूह आहे. याच्या प्रमुखांची नितीमत्ता व्यावसायिक जीवनात शुद्ध आहे, तशीच वैयक्तिक जीवनातही शुद्ध आहे. अशा या टाटा ग्रुपचे 'चेअरमन एमिरेट्स' रतन टाटा यांचे ९ ऑक्टोबर २०२४ला निधन झाले.त्यांच्या निधनानंतर समाज माध्यमांवर सुरवातीला रतन टाटा यांच्याबद्दल खूप चांगले लिहून येत होते, सर्वसामान्य लोकांना खरोखर दुःख झाले होते, ते भावूक झाले होते. पण डाव्यांसाठी म्हणजे कम्युनिस्टांसाठी तर टाटा एक भांडवलदार. त्यांची प्रशंसा होणे कम्युनिस्टांना खटकू लागले. त्यांनी मग त्याविरुद्ध लिहिणे सुरू केले. त्यात भांडवलशहा नोकरी देऊन उपकार करत नाहीत, टाटा आणि त्यांच्यासारखे भांडवलदार समाजोपयोगी काम करतात, त्यातून भांडवलशाही विचारधारा प्रस्थापित होत जाते असं कोणी लिहिलं, तर भांडवलशाहीमुळे युद्धे होतात, त्यांना मिळणारा प्रत्येक पैसा शोषणातूनच आलेला असतो, असेही कोणी लिहिले.आधी आपण टाटा ग्रुपच्या कामगिरीकडे बघू. त्यांनी उद्योग केला आणि नफाही नि:संशय कमावला, पण देशाच्या प्रगतीला त्यांनी मोठा हातभार लावलेला आहे. ते जर उद्योगात पडलेच नसते तर आज जी देशाची प्रगती झालेली दिसते तितकी झालेली नसती. तसेच देश काही बाबतीत स्वावलंबी आहे, तिथेही परदेशी कंपन्यांनी कब्जा केला असता. टाटा समुहाच्या कंपन्यांमध्ये लाखो लोकांना नोकऱ्या मिळाल्या, त्या लोकांचे जीवनमान नक्कीच उंचावलेले आहे. तसेच टाटा समुहाच्या उत्पादनांचा दर्जा चांगला असतो, गुणवत्ता चांगली असते, हाही लोकांचा विश्वास असतो. आयटी क्षेत्रात देशाने मोठी कामगिरी केलेली आहे, देशाच्या अर्थव्यवस्थेला भक्कम आधार दिला आहे, त्यात टाटांच्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएस या कंपनीचा फार मोठा वाटा आहे.



कम्युनिस्टांचे मत वाचून एक घटना आठवते. जेव्हा टाटा ग्रुप व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांची युती झाली होती. त्यातून काय घडले ते बघा. सीपीआयएम म्हणजे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्क्सिस्ट या पक्षाची १९७७ ते २०११ अशी तब्बल ३४ वर्षे पश्चिम बंगालमध्ये सत्ता होती. त्यापैकी १९७७ ते २००० ज्योती बसू व २००० ते २०११ बुद्धदेव भट्टाचार्य मुख्यमंत्री होते. पश्चिम बंगाल हा सीपीआयएमचा अभेद्य किल्ला होता. मग सत्ताबदल झाला कसा? अशा गोष्टींसाठी अर्थातच अनेक कारणे असतात. अप्रत्यक्षपणे टाटा समूह त्याला जबाबदार आहे का? किंवा असे म्हणता येईल की या सीपीआयएम म्हणजे कम्युनिस्ट पक्षाने भांडवलदार टाटा समूह यांच्याबरोबर केलेले सख्य पक्षाला महागात पडले?

खरे तर ब्रिटिशांच्या काळात कलकत्ता (तेव्हाचे नाव) हे ईस्ट इंडिया कंपनीसाठी व्यापाराचे मुख्य केंद्र होते. अनेक मारवाडी उद्योग घराणी इथे व्यापारासाठी आली व इथूनच ती मोठी झाली. काहींची तर सुरुवातच इथून झालेली होती. परंतु, सीपीआयएमची सत्ता आल्यानंतर त्यांचे धोरण उद्योगस्नेही नव्हते. भांडवलदार हे कामगारांचे शत्रू, शोषण करणारे ही कम्युनिस्टांची अधिकृत-पोथीनिष्ठ भूमिका होती. तेथील कामगार युनियनही कम्युनिस्टांचीच होती व ती आक्रमक म्हणून प्रसिद्ध होती. उद्योगांनाही सीपीआयएमबाबत अविश्वास होता. सीपीआयएमने जमीन सुधारणेवर लक्ष केंद्रित केले होते. बडे उद्योगधंदे त्यांना नको होते, नवीन उद्योगधंद्यांना तिथे आणण्यावर त्यांचा जोर नव्हता, धोरण नव्हते. छोट्या उद्योगांना त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यातून असंघटीत क्षेत्रात उद्योग निर्माण झाले.

तशातच १९९० नंतर जगभर व देशात आर्थिक उदारीकरणाचे धोरण सुरू झाले. आपल्याकडे त्याचा जम बसायला बरीच वर्षे लागली. खासगीकरणालाही २००० नंतरच थोडासा वेग आला. इतर राज्ये त्याआधारे प्रगती करत होती. महाराष्ट्र आधीपासून उद्योगात आघाडीवर होता पण त्याला स्पर्धा निर्माण झाली होती. आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात इत्यादी राज्यांतही नवे उद्योग सुरू होत होते. जागतिक पातळीवर साम्यवादी रशियाचेही विघटन झाले होते. अशा परिस्थितीत पश्चिम बंगालच्या मार्क्सवादी सरकारलाही खूप उशिरा का होईना, उद्योगांना निमंत्रण देणे गरजेचे वाटले. त्यात मग टाटा समूहाने नॅनो कारचा कारखाना सुरू करण्याची तयारी दाखवली. त्यासाठी सीपीआयएम सरकारने २००६मध्ये सिंगूर येथील जमीन संपादित करून ती टाटांना दिली. २००७मध्ये टाटांनी तिथे काम सुरू केले, बराच खर्च केला. पण सिंगूर येथील जमीनधारकांचा जमीन काढून घेण्याला विरोध होता. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी यांनी सीपीआयएम विरुद्ध जमीनधारकांची बाजू घेतली. त्यांनी सिंगूरच्या शेतकऱ्यांविरुद्ध अन्याय होत आहे, त्यांची सुपीक जमीन काढून घेतली जात आहे, असे मुद्दे घेतले. उपोषण केले, तीव्र आंदोलन केले. ते दीर्घकाळ चालले. शेवटी टाटांची खात्री झाली की हा कारखाना काही तिथे सुरू होऊ शकणार नाही. मग त्यांनी तो नुकसान सोसून सरळ दुसरीकडे हलवण्याचे २००८मध्ये ठरवले, गुजरात सरकारने अनेक सवलतींसह त्यांना आमंत्रण दिले. यंत्रसामग्रीसह तो कारखाना तिथे हलवण्यात आला.याच बरोबर २००७मध्ये सीपीआयएम सरकारने नंदीग्राम इथे चार हजार एकरवर एसईझेड - स्पेशल इकानॉमिक झोन वसवून तिथे केमिकल हब प्रस्थापित करण्याचे ठरवले. याविरुद्धही लोकांनी जोरदार आंदोलन केले. यात सरकारकडून गोळीबार झाला, त्यात काही लोक मरण पावले. यानंतरच्या निवडणुकीत सीपीआयएमचा पराभव झाला व तृणमूल काँग्रेसचा विजय झाला. सिंगूर व नंदीग्राम आंदोलनामुळे सीपीआयएमची लोकप्रियता घसरली, उलट तृणमूल काँग्रेस व ममता बॅनर्जी यांना नक्कीच फायदा मिळाला, लोकप्रियता मिळाली. या घटनेवरून काय निष्कर्ष काढता येईल? मार्क्सवादी व भांडवलदार यांची युती लोकांना आवडली नाही, असे म्हणता येईल का? की एवीतेवी मार्क्सवादी पक्षसुद्धा आपले धोरण बदलून उद्योगस्नेही करत असेल तर मग थेट अशा विचारांच्या पक्षालाच का निवडून देऊ नये, असा लोकांनी विचार केला असेल, असा निष्कर्ष तर काढता येणार नाही, पण कम्युनिस्ट पक्षही वेळ पडली तर लोकांवर तेवढीच दडपशाही करू शकतो हे निश्चितच दिसले. दुसरे छोट्या उद्योगांना सीपीआयएमने प्रोत्साहन दिले, पण या असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे वेतनमान संघटीत क्षेत्रातील कामगारांपेक्षा कमी असते, त्यांना नोकरीत सुरक्षितता नसते हेही उघड आहे. असे उद्योग किती वर्षे टिकतील, हाही प्रश्न असतो. कम्युनिस्ट राजवट असली तरी तिलासुद्धा उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक झालेले आहे हे स्पष्ट आहे. सीपीआयएमच्या अभेद्य सरकारलाही जर टाटासारख्या बड्या उद्योगाला परवानगी देणे, त्यांची हिरिरीने बाजू घेणे आवश्यक वाटले तर आता भांडवलशाही म्हणजे मुक्त अर्थव्यवस्था विरुद्ध कम्युनिस्ट विचारसरणी असा प्रश्न तरी राहिलेला आहे का, असा प्रश्न पडतो.आता २०२४मध्येसुद्धा सीपीआयएम पक्षाचा पश्चिम बंगालमध्ये काही जोर दिसत नाही. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत ४२ पैकी तृणमूलला २९ जागा मिळालेल्या आहेत, तर सीपीआयएमला एकही मिळालेली नाही. ममता बॅनर्जी २०११पासून तिथे सत्तेवर तर आलेल्या आहेत, पण राज्याला त्या पुढे कसे नेणार हा प्रश्न आहे. तिथे उद्योगधंदे तर आणावेच लागतील नाहीतर रोजगार कसे निर्माण होणार?

# पुन्हा हिबाकुशा नकोत म्हणून...

गेल्या वर्षी जगभर ओपनहायमर चित्रपट प्रदर्शित झालं. रोबर्ट ओपनहायमर यांना अणुबॉम्बचे जनक म्हटलं जातं. ओपनहायमर चित्रपट प्रचंड लोकप्रिय झालं. त्याला अनेक पुरस्कार मिळाले. त्या चित्रपटाच्या अनुषंगाने अणुबॉम्बची चर्चा परत सुरू झाली. अणुबॉम्बमध्ये मानववंशाला संपवण्याची क्षमता असल्याने अणुबॉम्बच्या विरोधात अनेक जण बोलू लागले. १९५० आणि १९६० च्या दशकात महान तत्त्वज्ञ बट्रान्ड रसेल अणुबॉम्बच्या विरोधात बोलत होते. त्यांनी स्थापन केलेली पुगवॉश नावाची संस्था आजही सक्रिय आहे.



ओपनहायमर सिनेमा रिलीज झाला २०२३मध्ये आणि यावर्षी निहॉन हिरानक्यो नावाच्या जपानी संस्थेला शांततेचा नोबल पुरस्कार जाहीर झाला, ही महत्त्वाची गोष्ट आहे. अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी शहरावर अनुक्रमे ६ ऑगस्ट १९४५ आणि ९ ऑगस्ट १९४५ ला अणुबॉम्ब टाकलेले. काही लाख लोक त्यात मारले गेले. या अण्वस्त्र हल्ल्यातून वाचलेल्या काही लाखांवर किरणोत्सर्गाचा परिणाम झाला. अण्वस्त्र हल्ल्यातून वाचलेल्या लोकांना जपानी भाषेत हिबाकुशा म्हणतात. जवळपास एक लाख हिबाकुशा आज जपानमध्ये आहेत. निहॉन हिरानक्यो अशा हिबाकुशांसाठी आणि जग अण्वस्त्रमुक्त करण्यासाठी काम करते. यापुढे भविष्यात कोणीही हिबाकुशा होता कामा नये, हा त्यांचा उद्देश. आज पश्चिम आशियात इस्रायल विरुद्ध गाझा पट्टी, लेबनॉन, इराण, येमेन युद्ध सुरू आहे. दुसरीकडे रशिया-युक्रेन युद्ध लवकर थांबण्याची चिन्हं दिसत नाहीत. अशावेळी निहॉन हिरानक्यो सारख्या संस्थेची अधिक आवश्यकता असल्याचं जाणवतं.

निहॉन हिरानक्यो या संस्थेची स्थापना १० ऑगस्ट १९५६ मध्ये झाली. हिबाकुशा यांची ही जपानमधील सर्वांत मोठी संस्था आहे. जपानमध्ये काही संस्था अणुबॉम्बला विरोध करतात. हिरोशिमाच्या महापौराच्या नेतृत्वाखालील मेयर्स फॉर पीस ही संस्थादेखील सक्रिय आहे. जगातल्या प्रत्येक देशाने त्यांच्या संरक्षणावरील खर्च कमी करावा आणि त्याचा विकासाच्या कामात उपयोग करावा, असं त्यांचं म्हणणं आहे. वेगवेगळ्या देशात जाऊन हिबाकुशा अण्वस्त्रांच्या विरोधात प्रचार करतात. १९९७ मध्ये सात-आठ हिबाकुशा मुंबईत आले होते. त्यांच्यासोबत मी तीन दिवस होतो. त्यांच्यावर महात्मा गांधी यांचा प्रभाव या दौऱ्यात सतत जाणवत होता. त्यांची पत्रकार-परिषद आम्ही मणीभवन येथे आयोजित केली होती. नाना चौक जवळील मणीभवनात महात्मा गांधी मुंबईत असताना राहत असे. आता ते राष्ट्रीय म्युझियम आहे. महात्मा गांधी जिथे राहत होते त्या ठिकाणी पत्रकार-परिषद होत आहे. या कल्पनेचा त्यांना प्रचंड आनंद झालेला. डॉ. उषा मेहतांची त्यात सक्रिय भूमिका होती. महाराष्ट्र सरकारने हिबाकुशा यांच्या दौऱ्यात मदत केली होती. जिथे जिथे ते गेले त्या प्रत्येक ठिकाणी ते जगाला अणुबॉम्बचा धोका अशा स्वरूपाने आहे, ते समजावून सांगत. मानववंशाला वाचवण्यासाठी जगाला अण्वस्त्रमुक्त केलं पाहिजे, त्यावर त्यांचा भर असे. मोरिटाकी सान नावाच्या महिला हिबाकुशांच्या त्या गटाच्या नेत्या होत्या. आजही त्या जपानात सक्रिय आहेत.

जपानचे माजी पंतप्रधान इशाकू साटो यांना १९७४मध्ये नोबल शांतता पुरस्कार देण्यात आला. १९७०मध्ये पंतप्रधान असताना साटो यांनी जपानच्या वतीने अण्वस्त्र वाढू नये, या करारावर (एनपीटी) सही केली होती. जगात अणुबॉम्बचा प्रसार होऊ नये आणि अणुऊर्जेच्या शांततामय मार्गासाठी उपयोग करण्यास हा करार प्रोत्साहन देतो. १९०हून अधिक राष्ट्रं एनपीटीचे सभासद-राष्ट्र आहेत. अमेरिका, रशिया, चीन, ब्रिटन आणि फ्रान्सही एनपीटीचे सभासद आहेत.तोशिमुकी मिमाकी हे निहॉन हिरानक्यो या संस्थेचे संयुक्त-प्रमुख आहेत. ७९ वर्षांपूर्वी हिरोशिमा येथे बॉम्ब टाकला गेला तेव्हा ते तीन वर्षांचे होते. नोबल पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यानी म्हटलं की गाझा येथे शांततेसाठी संघर्ष करणाऱ्यांना नोबल पुरस्कार मिळेल, असं मला वाटत होतं. यावर्षी ९ ऑगस्टला नागासाकी येथील कार्यक्रमात इस्रायलच्या राजदूताला आमंत्रित करण्यात आलं नव्हतं. त्यामुळे अमेरिका, ब्रिटन, युरोपीय समुदाय व इतर काही देशांचे प्रतिनिधीदेखील त्या कार्यक्रमात अनुपस्थित राहिले.

बराक ओबामा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असताना १९१६मध्ये हिरोशिमाला गेले होते. हिरोशिमाला जाणारे ते पहिले अमेरिकन राष्ट्राध्यक्ष. २७ मे ला ओबामा आणि जपानचे पंतप्रधान शिन्झो एबे एकत्र हिरोशिमाला गेले. हिरोशिमा पीस म्युझियम आणि मेमोरियल पार्कला त्यांनी भेट दिली. ते काही हिबाकुशांशी बोलले आणि स्वतःच्या हाताने बनवलेले कागदाचे सारस पक्षी त्यांनी दोन मुलांना दिले. ओबामाची ही भेट 'ऐतिहासिक' होती. हिरोशिमा पीस म्युझियम पाहण्यासाठी जगभरातून मोठ्या संख्येत लोक येत असतात. पीस म्युझियम अशा स्वरूपाचं बनवण्यात आलं आहे की संपूर्ण म्युझियम पाहिल्यानंतर कुठलाही माणूस युद्धाचा समर्थक राहू शकत नाही. पीस म्युझियमच्या व्हिजिटर बुकमध्ये ओबामा यांनी लिहिलं, 'युद्धाच्या वेदना आपल्याला माहीत आहेत. आता आपण एकत्र येऊन शांततेच्या प्रसाराची हिंमत दाखवू आणि अण्वस्त्रमुक्त जगाचा पाठपुरावा करू या.'

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने गुप्त पद्धतीने 'मॅनहटन प्रकल्प' अंतर्गत अणुबॉम्ब तयार केले. त्या प्रकल्पाची मुख्य जबाबदारी होती ओपनहायमर यांच्याकडे. जर्मनीच्या आधी अणुबॉम्ब तयार करण्याचा त्यांचा प्रयत्न होता आणि त्यात त्यांना यशही मिळालं. १९४५च्या मे महिन्यात जर्मनीने कुठल्याही अटींशिवाय शरणागती पत्करली होती. त्यासोबत युरोपमधलं दुसरं महायुद्ध पूर्ण झालं. अमेरिकेने ६ ऑगस्टला जपानच्या हिरोशिमावर 'लिटल बॉय' नावाचा आणि ९ ऑगस्टला नागासाकी वर 'द फॅट मॅन' नावाचा अणुबॉम्ब टाकला. त्याआधीच दुसऱ्या महायुद्धात जपानची वाटचाल पराभवाच्या दिशेने सुरू झाली होती. खरं तर जपान शरणागती पत्करण्याच्या अगदी जवळ होता. जपानचे राजे हिरोहिटो यांनी १५ऑगस्ट १९४५ ला रेडिओ टोकियोवरून राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात शरणागतीचे सूतोवाच केले होते. हिरोशिमा आणि नागासाकीवर टाकण्यात आलेल्या अणुबॉम्बचा उल्लेख हिरोहिटो यांनी 'नवीन आणि अतिशय पाशवी' असा केला होता. शेवटी दोन सप्टेंबर १९४५ ला शरणागती करारावर सह्या करण्यात आल्या आणि त्यासोबत दुसरं महायुद्ध संपलं.

अशा परिस्थितीत अमेरिकेला जपानवर अणुबॉम्ब टाकण्याची आवश्यकता होती का, हा प्रश्न आहे. अमेरिकेने अणुबॉम्बची चाचणी केली. त्यात हिरोशिमा आणि नागासाकी नावाची शहरं उद्ध्वस्त झाली. २.५० लाखाहून अधिक लोक मरण पावले. जिवंत राहिलेल्या बहुतांश लोकांवर किरणोत्सर्गाचा परिणाम झाला. त्यातून कर्करागाचे प्रमाण वाढले. ओपनहायमर यांना हिरोशिमा आणि नागासाकी येथील विध्वंस पाहून प्रचंड दुःख झालं. हायड्रोजन बॉम्ब विकसित करण्यास त्यांनी विरोध केला. अमेरिकेचे तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष हेन्री ट्रुमेन यांनी ओपनहायमर कम्युनिस्ट असल्याचं म्हटलं आणि हायड्रोजन बॉम्ब बनवण्याच्या कामात तो अडथळा आणत असल्याचा आरोप केला.आज जगात अमेरिका, रशिया, फ्रान्स, चीन, ब्रिटन, भारत, पाकिस्तान आणि उत्तर कोरियाकडे अण्वस्त्रे आहेत. इस्रायलकडेही असण्याची शक्यता आहे. एक-दोन इतर राष्ट्रांकडे देखील अणुबॉम्ब असू शकतात. आजच्या अणुबॉम्बची क्षमता हिरोशिमा आणि नागासाकीवर टाकण्यात आलेला बॉम्बपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. निहॉन हिदानक्यो, मेयर्स फॉर पीस, पीस बोट सारख्या जपानच्या काही संघटना जग अण्वस्त्रमुक्त करण्यासाठी धडपडत आहेत. प्रत्येक राष्ट्राने दरवर्षी संरक्षणावरील खर्च कमी करावा, असं मेयर्स फॉर पीसचे म्हणणे आहे. त्या रकमेचा उपयोग विकासाच्या कामासाठी होऊ शकतो, अशी त्यांची भूमिका आहे. मेयर्स फॉर पीसचे प्रमुख हिरोशिमाचे महापौर आहेत. आज जगात काही हजार बॉम्ब आहेत आणि संपूर्ण पृथ्वीला अनेकदा संपवण्याची त्यांची क्षमता आहे. पश्चिम आशियातील परिस्थिती आपण पाहत आहोत. इस्रायल आणि शेजारी राष्ट्रांमधील युद्धाची व्याप्ती वाढत आहे. आपलं नशीब की, हिरोशिमा आणि नागासाकीनंतर अणुबॉम्ब असलेल्या कुठल्याही देशाने इतर देशावर अणुहल्ला केलेला नाही. अणुबॉम्बला जात, धर्म, राष्ट्र, सरहद इत्यादींशी काहीही संबंध नसतो. अणुबॉम्ब म्हणजे विध्वंस एवढाच त्याचा अर्थ होतो.जगभर अनेक संस्था, संघटना दरवर्षी सहा आणि नऊ ऑगस्टला अण्वस्त्राच्या विरोधात निदर्शने करतात. मुंबईत तर गेल्या ३३ वर्षांपासून दरवर्षी गांधीवादी कार्यकर्ते आणि मुंबई व एसएनडीटी विद्यापीठातील विद्यार्थी हुतात्मा चौक येथे निदर्शने करून जग अण्वस्त्रमुक्त बनवण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घेतात, नव्या पिढीच्या हाती आता अण्वस्त्रमुक्तीचा ध्वज आहे, त्याला बळ मिळालं पाहिजे.

# भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाचे संविधान दिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**


दिनांक : २६ नोव्हेंबर संविधान दिनी भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल बीड व सर्व भारतीयांनी संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्राचे संरक्षण सचिव आद. अमरसिंह ढाका, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड (प.) चे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे, संरक्षण उपाध्यक्ष कॅप्टन राजाभाऊ आठवले मेजर, समता सैनिक दल बीड तसेच शहराध्यक्ष एड. केतन गायकवाड, से.नि. अतिरिक्त सीईओ पी.व्ही. बनसोडे व भारतीय बौद्ध महासभेचे बहुसंख्य पदाधिकारी, महिला पदाधिकारी व समता सैनिकालाचे सैनिक उपस्थित होते. या संविधान दिनी सर्व उपस्थितांनी बुद्ध वंदना घेऊन संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. नंतर जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे यांनी संविधानाचे महत्व पटवून देत सर्व भारतीयांना संविधान दिनाच्या शुभेच्छा देऊन मंगल कामना केली. तसेच बनसोडे व कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी संविधानावरती सुंदर असे गीत गाऊन सर्वांना प्रफुल्लित केले. त्यानंतर भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र संरक्षण सजीव पदी नवनियुक्त झालेले आद. अमरसिंह ढाका यांचा येथे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच समता सैनिक दलाच्या दोन महिला लाटून कमांडर सुजाता प्रशांत वासनिक व लाटून कमांडर प्रतिभा रणजीत वाघमारे यांची पदोन्नती होऊन यांना कंपनी कमांडर पद देण्यात आले व त्यांचे या संविधान दिनाचे अवचित साधून महाराष्ट्राचे संरक्षण सचिव अमरसिंह ढाका, जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे व संरक्षण उपाध्यक्ष कॅप्टन राजभाऊ आठवले मेजर समता सैनिक दर यांच्या हस्ते रैंक लावून सत्कार करण्यात आला. संविधान दिनाचे अवचित साधून रैंक लावल्याबद्दल सुजाता वासनिक व प्रतिभा वाघमारे यांनी उपस्थितांना पेढे वाटून संविधान दिन साजरा केला. समता सैनिक दलाने याप्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना देण्यात आली.



# अंबिका चौकात ट्रॅफिक जाम कायमस्वरूपी मार्ग काढा अन्यथा आंदोलन करू–सारिका गायकवाड

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात अंबिका चौक हा प्रमुख चौक असल्याने त्या ठिकाणी सातत्याने सकाळी व सायंकाळी ट्रॅफिक जॉब होत आहे. अंबिका चौकात पोलीस प्रशासनाकडून सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसवण्यात आले आहेत. परंतु या ट्रॅफिक जामचा सर्व जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना महिलांना वृद्ध व्यक्तींना व वाढचालकांना त्रास होत आहे. बीड शहरातील गजबजलेल्या चौका पैकी हा अंबिका चौक प्रमुख चौक आहे. तात्काळ ही समस्या सोडविण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या सारिका गायकवाड यांनी ट्रॅफिक जाम मध्ये अडकल्यानंतर प्रत्यक्ष स्पॉटवरून बातमी करून पाठवली आहे. वाहतूक पोलीस शाखेचा एखादा एखादा कर्मचारी त्या ठिकाणी असणे आवश्यक आहे कारण अंबिका चौकातून



पुढे बायपास कडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक मंगल कार्यालय आहेत. बीड शहरात रिंग रोड ह्याच चौकातून पुढे जातो. बीड नगरपालिका व वाहतूक तात्काळ लक्ष घालून यावर उपाय योजना करावी अशी मागणी केली आहे.

# सर्वसामान्यांची शक्ती म्हणजेच भारतीय संविधान–प्रा.गणेश पोकळे

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय संविधानाचा नावलौकिक संपूर्ण जगात असून सर्वसामान्यांची शक्ती म्हणजेच संविधान हे समीकरण स्वातंत्र्यापासून बनले असून संविधानामुळेच दुबळयांचे सशक्तिकरण शक्य झाले असल्याचे प्रतिपादन प्राचार्य गणेश पोकळे यांनी व्यक्त केले.

वसंतराव काळे पत्रकारिता आणि संगणकशास्त्र महाविद्यालय व संभाजीराजे ग्रंथालय व व्यवस्थापन शास्त्र महाविद्यालय, बीड येथे आयोजित संविधान दिनाच्या कार्यक्रमात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

पुढे बोलताना त्यांनी समाजामध्ये न्यायसमाज व्यवस्था निर्माण करण्यात संविधानाची भूमिका अत्यंत महत्त्व राहिले आहे.



संविधानामुळेच अनेक जटिल सामाजिक समस्या सोडविता आल्या असेही असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रप्राचार्य बप्पासाहेब हावळे, प्रा. शिवशंकर पटवारी, प्रा. सुहास गाढवे, प्रा. राजश्री महाजन, प्रा. फिरोज शेख, प्रा. कोमल सुरवसे, याबरोबरच महेश नेवडे, दीपक जाधव, इमरान शेख, सचिन चौरे आणि श्रीमती संध्या खोसे यांची उपस्थिती होती.याच कार्यक्रमात मुंबईतील २६ ११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# विकासाच्या मुद्द्यावर मी ही लढाई जिंकलो–आ.प्रशांत बंब

**गंगापुर । प्रतिनिधी**

गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघांमध्ये अत्यंत चुरशीची

लढत बघायला मिळाली यामध्ये आमदार प्रशांत बंब यांनी ५५०९ एवढ्या मतांनी विजयी झाले आहेत. संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागलेल्या गंगापूर खुलताबाद विधानसभेच्या निवडणुकीत कोण विजयी होणार याविषयी तर्कवितर्क लावले जात होते. सकाळी आठ वाजता प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर आठव्या फेरीपर्यंत खुलताबाद मधून पदवीधरचे आमदार सतीश चव्हाण यांनी ४ हजाराची आघाडी घेतली होती. परंतु गंगापूर मतदार संघ चालू होतात आमदार प्रशांत बंब यांनी २७ व्या फेरीपर्यंत ५५०९ एवढी आघाडी घेऊन गंगापुर खुलताबाद विधानसभा मतदार संघात विजय संपादन केले. याप्रसंगी कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष साजरा केला. प्रशांत बंब हे भाजपचे औरंगाबाद छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील गंगापूर विधानसभा मतदारसंघातील आमदार आहेत. तरुण तडफदार, आक्रमक आणि अभ्यासू आमदार म्हणून त्यांची ख्याती आहे. भाजपचे गंगापूर विधानसभा आमदार आहेत. तरुण तडफदार, अभ्यासू आमदार म्हणून त्यांची घरात कोणतीही राजकीय राजकारणात येऊन सलग चौथ्यांदा निवडणूक बंब यांनी जिंकली. स्वतःला सिद्ध केलं. हे कसं घेतलेला हा आढावा. प्रशांत बंब राजकीय पाश्र्वभूमी नाही. त्यांनी राजकारणात प्रवेश केला राजकारणात आल्यावर त्यांना आणि त्यांचं नेतृत्वही तयार लासूर स्टेशन ग्रामपंचायत सरपंच, जिल्हा परिषद सदस्य जिल्हा परिषदेच्या अर्थ व सभापतीपद आदी पदे त्यांनी भूषविली आहेत. स्थानिक प्रशासनाचा अनुभव असल्यानेच राज्य स्तरावर काम करताना त्याचा त्यांना फायदा होतो.२००९, ३०१४ आणि २०१९ व २०२४ मध्ये ते सलग चार वेळा विधानसभेवर निवडून आले आहेत. मतदारसंघातील नागरिकांशी सातत्याने असलेला संपर्क, कार्यकर्त्यांची मजबूत फळी उभारण्यात आलेलं यश, सर्वांच्या सुखादुखात धावून जाणे आणि मनमिळावूपणा यामुळे ते आपला मतदारसंघ राखू शकले आहेत. हेच त्यांच्या यशाचं गमक आहे. विशेष म्हणजे गंगापूर विधानसभा मतदारसंघात हॅट्रीक साधण्याचा विक्रमही त्यांनी केला.आणि आता चौथ्यांचा निवडून आलेले आहेत.प्रशांत बंब हे मतदारसंघातील आक्रमक आणि ख्याती आहे. पाश्र्वभूमी नसताना विधानसभेची तसेच राजकारणात घडलं? याचाच यांना कोणतीही एमबीए झाल्यानंतर . विशेष म्हणजे यश मिळत गेले झालं. २००२ मध्ये सदस्य, उपसरपंच, , २००५ मध्ये बांधकाम समितीचे प्रशांत बंब सलग दुसऱ्यांदा निवडून आल्यानंतर २०१४ मध्ये राज्यातील फडणवीस सरकारमध्ये त्यांचा समावेश होईल असं बाटत्त होतं. मात्र, बराच कालावधीनंतर राज्यात भाजपची सत्ता आली होती. त्यामुळे मंत्रिमंडळात नव्या जुन्या नेत्यांची मोट बांधणं आवगयक होतं. त्यातच शिवसेना मित्रपक्ष असल्याने सेनेकडे काही मंत्रिपदं गेली. त्यामुळे मंत्रिपदाच्या वाटपाची तारेवरची कसरत देवेंद्र फडणवीस यांना करावी लागली. त्यामुळे बंब यांना संधी मिळू शकली नाही. विशेष म्हणजे फडणवीसांची जवळीक असूनही त्यांना मंत्रिमंडळात संधी मिळू शकली नाही. मात्र, तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर बंब आता मंत्री होणारच असं वाटत

होतं. परंतु, राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आलं. भाजपला विरोधात जाऊन बसावं लागल्याने यावेळीही बंब यांचं मंत्रिपदाचं स्वप्नं भंगलं. आता गंगापूर तालुक्याला मंत्रीपद येणार याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.२०१९ मधील गंगापूर विधानसभा निवडणूक तशी बंब यांच्यासाठी सोपी नव्हती. कारण काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या दिग्गज नेत्यांचं त्यांच्यासमोर आव्हान होतं. मात्र, त्यांनी या निवडणुकीत बाजी मारून गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यात आपलेच बर्चस्व असल्याचं त्यांनी दाखवून दिलं आहे. मतांचं ध्रुवीकरण करून बंब यांना शह देण्याचा प्रयत्नही यावेळी झाला. पण बंब त्याला बधले नाही. त्यांनी विरोधकांचे सर्व प्रयत्न फोल ठरवले. शिवसेनेतून काँग्रेसमध्ये येऊन निवडणूक लढवणाऱ्या संतोष माने यांचा त्यांनी मोठा पराभव केला. आणि २०२४ मध्ये पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांचा पराभव केला.

# बांगर यांना आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी पाठवले विमान : हैदराबादहून मुंबईला रवाना राजकीय वर्तुळात मंत्रिपदाची चर्चा

**हिंगोली (वृत्तसंस्था)**

कळमनुरीचे आमदार संतोष बांगर यांना तातडीने मुंबईला येण्याचे आदेश मिळाले. त्यांना घेऊन जाण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेयांनी हैदराबाद येथे खासगी विमान पाठवले आहे.रविवारी सायंकाळी तेमुंबईकडे रवाना झाले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेयांचे विश्वासू आमदारम्हणून आमदार संतोष बांगर यांची ओळखआहे. नुकत्याच झालेल्या विधानसभानिवडणुकीत आमदार बांगर यांनी एकहातीविजय मिळवला. हिंगोली येथे शनिवारीमारहाणीमध्ये आमदार बांगर यांचे पुतणे गौरवबांगर यांना पोटात गोळी लागली. गौरवयांच्यावर हैदराबाद येथे रुग्णालयात उपचारसुरु आहेत. त्यांच्या देखभालीसाठी आमदारबांगर यांच्यासह त्यांचे कुटुंबिय हैदराबाद येथेथांबले आहेत.दरम्यान, रविवारी मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांनी तातडीने त्यांना मुंबईतपोहोचण्याचे आदेश दिले. त्यांना हैदराबादयेथून मुंबईला येण्यासाठी खासगी विमानहीपाठविले. त्यामुळे दुपारी खासगी विमानहैदराबाद विमानतळावर पोहोचले. त्यानंतरसायंकाळीच आमदार बांगर मुंबईला रवानाझाले. त्यांना तातडीने मुंबईला येण्याचा



आदेशमिळाल्यामुळे आमदार बांगर यांचीमंत्रीमंडळात वर्णी लागेल, अशी चर्चा सुरुझाली आहे. मतमोजणीपुर्वीच आमदार बांगरयांचे भावी मंत्री म्हणून बॅनर झळकले होते.महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर आताआमदारांना तातडीने मुंबईला बोलावले जातआहे. त्याच पार्श्वभूमीवर बांगर यांनाही मुंबईलाबोलावल्याने पुढील निर्णयाकडे हिंगोलीजिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

# पवनराजे इंग्लिश स्कूल केज येथे संविधान दिन उत्साहात साजरा

## इयत्ता १० व ९ वीच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केले मनोगत

**केज । प्रतिनिधी**

पवनराजे इंग्लिश स्कूल तथा कै.राम चौरे प्राथ. माध्य. व उच्चमाध्यमिक विद्यालय केज येथे संविधान दिन मोठ्या हर्षउल्हासाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.या बाबत वृत्त असे कि केज तालुकात तथा शहरामध्ये इंग्लिश माध्यमांची शाळा म्हणून प्रसिद्ध असलेली पवनराजे इंग्लिश स्कूल केज येथे संविधान दिनाचे औचित्य साधुन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पवनराजे इंग्लिश स्कूल तथा कै.राम चौरे प्राथ. माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष खंडेराव चौरे हे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रिन्सिंपल अशोक मस्के , घुले सर, विशाल सिरसट हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधानाच्या प्रस्ताविकेचे पुजन करण्यात आले . त्यानंतर प्रस्ताविकेचे वाचन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच पवनराजे इंग्लिश स्कूल मधील इयत्ता १० वी व ९ वीच्या विद्यार्थिनी कु.भक्ति भांगे , म्हणून कु.अंतिमा खंडेलवाल, कु.अंजली






बनसोड,कु.पुजा घुले, कु.श्रुती ढाकणे,कु.श्रद्धा ढाकणे, कु.अश्विनी जाधव यांनी तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रिन्सिंपल अशोक मस्के , घुले सर, यांनी आपले मनोगत व्यक्त केली तर अध्यक्षीय समारोपात अध्यक्ष खंडेराव चौरे सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतासाठी असणारे योगदान यावर आपले विचार व्यक्त केले.सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय भांगे सर यांनी केले तर आभार डी.एस. चौरे सर यांनी मानले या कार्यक्रमास दळवी मॅडम ,सिद्धार्थ शिंनगारे सर, घुले पाटील सर , भांगे सर, आदि शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तथा मोठया संख्येने विद्यार्थी उपास्थित होते.

### विविध सामाजिक संघटना, संस्थाच्या पाठपुराव्याला यश

# बुधवार दिनांक २७ नोव्हेंबर पासून एनएमएमटीची सेवा सुरु

## तब्बल ९ महिन्यांनी नवी मुंबई परिवहन सेवा (NMMT )ची सेवा सुरु

## जनतेत आनंदाचे वातावरण;वेळ, पैशेची होणार बचत

**उरण | विठ्ठल ममताबादे**

फेब्रुवारी महिन्यामध्ये उरण तालुक्यातील खोपटे येथे झालेल्या भीषण अपघातानंतर नवी मुंबईसाठी प्रवासाची जीवनरेखा ठरलेली 'एनएमएमटी'ची बससेवा नवी मुंबई परिवहन बस सेवेच्या व्यवस्थापनाने कामगारांची सुरक्षा आणि तोट्यात चालणारा मार्ग ठरवून अनिश्चित काळासाठी उरण मध्ये एनएमएमटीची सेवा बंद केली होती . याचा फटका उरणच्या प्रवाशांना बसला.यामध्ये विशेषतः जेष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि कामगार यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांनाही त्रास सहन करावा लागत होता . त्यामुळे उरणकर प्रवाशांना आपले निश्चित ठिकाण गाठण्यासाठी धोकादायक खाजगी वाहतुकीचा आसरा घ्यावा लागला होता यामुळे वेळ आणि अधिकच्या खर्चाचा भार उरणकरांच्या खिशावर पडत होता.मात्र बुधवार दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ पासून उरण तालुक्यात एनएमएमटी ची बस सेवा सुरु होणार असल्याची माहिती नवी मुंबई परिवहन बस सेवेचे व्यवस्थापक योगेश कडूस्कर यांनी दिली. त्यामुळे जनतेत आनंदाचे वातावरण पसरले आहे. उरण ते कोपरखैरणे, जुईनगर रेल्वे स्थानक, कळंबोली दरम्यानच्या ३०,३१ आणि ३४ या क्रमांकाच्या मार्गावरील 'एनएमएमटी'ची बससेवा परिवहन उपक्रमाकडून पूर्णपणे बंद करण्यात आली होती . या व्यवस्थेला पर्याय म्हणून प्रवाशी वर्गांनी रेल्वेला पसंती दिली होती मात्र उरण ते बेलापूर, नेरुळ मार्गावर उरण रेल्वे स्थानकातून एका तासाने लोकल सुटत आहेत. त्यामुळे नवी मुंबई, मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तासभर लोकलची वाट पहावी लागत होती . शिवाय उरण शहरातून रेल्वे स्थानक गाठण्यासाठी प्रवाशांना रिक्षाचे अधिकचे भाडे मोजावे लागत होते . या समस्येमुळे शहरातून आणि तालुक्यातील गावाजवळून जाणाऱ्या 'एनएमएमटी'मुळे प्रवास करणे अधिक सोयीचा होता. मात्र, बससेवा बंद झाल्याने नागरिकांना अनेक संकटांचा सामना करीत प्रवास करावा लागत होता . त्यामुळे 'एनएमएमटी'ची बससेवा लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी उरणकर नागरिकांकडून केली जात होती.मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, कॉंग्रेस पक्ष,जनवादी महिला संघटना, उरण सामाजिक संस्था, जेष्ठ नागरिक संस्था, मॉर्निंग कट्टा ग्रुप यांच्यासह विविध सामाजिक संस्था, संघटना यांनीही एनएमएमटी सुरु करण्याबाबत पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे.अनेक वर्षांपासून उरण तालुक्यात सुरु असलेली एनएमएमटी बससेवा दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ पासून अचानक बंद करण्यात आली होती.सदरची बससेवा तात्काळ सुरु करण्याची मागणी उरण तालुक्यातील विविध सामाजिक संस्था, संघटनानी एनएमएमटी प्रशासनाकडे केली होती.नवीमुंबई महानगर पालिकेच्या परिवहन विभागाच्या वतीने उरण ते नवी मुंबई मार्गावर बस सेवा सुरु होती. जुईनगर ते उरण शहरासह तालुक्यातील कोप्रोली, वशेणी व पिरकोन या मार्गांवर चालणाऱ्या ३०, ३१ व ३४ क्रमांक असलेल्या एनएमएमटी बस दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ पासून अचानकपणे बंद करण्यात आल्या होत्या . त्यामुळे उरण तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते .एनएमएमटी बंद झाल्याने व्यवसाय, नोकरी, धंदा, कार्यालयीन व दैनंदिन कामासाठी मुंबई, ठाणे, नवीमुंबईकडे जाणाऱ्या हजारो प्रवाशांचे हाल होत आहेत. त्याच प्रमाणे आर्थिक नुकसान देखील होत आहे. याशिवाय दहावी, बारावी तसेच विविध कोर्स तसेच उच्च शिक्षण घेण्यासाठी उरण तालुक्यातील विद्यार्थी मुंबई, नवी मुंबई मध्ये शिकण्यासाठी मोठया प्रमाणात जात असतात. या सर्वांसाठी एनएनएमटी बसने प्रवास करणे सुरक्षित एकमेव व उत्तम पर्याय होते. मात्र एनएमएमटी बंद झाल्याने विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे. उरण मध्ये रेल्वे सेवा सुरु झाली आहे मात्र रेल्वेच्या फेऱ्या नवी मुंबई साठी एक - एक तासाने आहेत. रेल्वे सेवेच्या नवी मुंबईत जाण्यासाठी व नवी मुंबई मधून परत उरण मध्ये येण्यासाठी फेऱ्या कमी असल्यामुळे व वेळेत रेल्वे सेवा नसल्याने रेल्वे सेवेचा प्रवाशांना योग्य तो फायदा होत नाही.रात्री १० नंतर रेल्वे सेवा बंद असल्यामुळे विद्यार्थी सुरक्षित प्रवास करू शकत नाही. आणि रेल्वे रात्री मिळाली नाही तर विद्यार्थी व प्रवाशांना नवी मुंबई मध्ये रात्री अडकून राहावे लागते. रेल्वे सेवेचा विद्यार्थ्यांना कोणताच फायदा नाही. त्यामुळे उरण तालुक्यात एनएमएमटी तात्काळ सुरु करण्याची मागणी सोनारी येथील सामाजिक कार्यकर्ते मंगेश तांडेल यांनी देखील केली होती. त्यांच्याही मागणीला आता यश आले आहे.

**उरण तालुक्यात एनएमएमटीची बस सेवा सुरु व्हावी यासाठी आम्ही पत्रव्यवहार केला. पाठपुरावा केला. आता आमच्या मागणीला यश आले आहे. आता जनतेचा प्रवास सुलभ, आनंददायी, सुरक्षित होणार आहे. पैशेची व वेळेची सुद्धा बचत होणार आहे. उरण करांसाठी हा महत्वाचा निर्णय आहे. आम्ही एनएमएमटी प्रशासनाचे आभार मानतो.एनएमएमटी ने ही सेवा कायमची सुरळीतपणे चालू ठेवावी तसेच प्रवाशांना अधिकाधिक चांगल्या व उत्तम सुविधा मिळाव्यात हिच आमची प्रमुख मागणी आहे.**

**– कॉम्रेड भूषण पाटील,माजी विश्वस्त जेएनपीटी, सामाजिक कार्यकर्ते उरण.**

**बंद असलेली सेवा विविध सामाजिक संस्था, संघटना, जनता यांच्या आग्रहास्तव सुरु केली आहे.याचा फायदा प्रवाशी वर्गाला होणार आहे. प्रवाशी वर्गांनी याचा लाभ घ्यावा ही विनंती.**

**– योगेश कडूस्कर, परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई परिवहन सेवा**

# लोककल्याणकारी निर्णय घेणारे एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत

### शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हाप्रमुख महादेव मातकर यांची मागणी

**बीड | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला अभूतपूर्व यश मिळाले. लोककल्याणकारी योजना राबविल्याने महायुतीला बहुमत मिळाले, भविष्यातही राज्याचे हित पाहता एकनाथजी शिंदे यांनाच मुख्यमंत्री पदावर विराजमान करावे, अशी मागणी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हा प्रमुख महादेव मातकर यांच्यासह शेकडो निष्ठावंत समर्थकांनी केली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप- सेना महायुतीला अभूतपूर्व असे यश प्राप्त झाले. महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथजी



शिंदे साहेब यांचा चेहरा समोर ठेवून महायुतीने निवडणूक लढविली. या निवडणुकीत जनतेने एक हाती सत्ता महायुतीला दिली. मुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी विविध लोककल्याणकारी योजना राबवून थेट जनतेला लाभ मिळवून दिला. आपल्या केवळ अडीच वर्षाच्या कालावधीत अतिशय धडाकेबाज कामगिरी केली. त्यांच्या कामाची पावती मिळाली. राज्यात महायुतीला मोठे बहुमत मिळाले, या सर्व बाबीचा पुरेपूर विचार करून महायुतीच्या नेत्यांनी पुन्हा राज्याची धुरा लोकनेते एकनाथजी शिंदे यांच्याकडे देत त्यांना मुख्यमंत्री पदावर विराजमान करावे, अशी मागणी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे बीड जिल्हा प्रमुख महादेव मातकर यांच्यासह शरद झोडगे, कपिल जोगदंड, सतीश शेळके, दिलीप उढाण, आदी निष्ठावंत समर्थकांनी केली आहे.

# मंदिर परिसरातील फाटकाचा विषय मुख्याधिकाऱ्याकडून दुर्लक्षित–ॲड.संकाये

## वारंवार निवेदने देऊनही लोकहिताची मागणी मान्य होईना

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून परळीची ओळख आहे. याच परळीमध्ये मुख्याधिकाऱ्याचा मनमानी कारभार सुरू आहे. वारंवार निवेदने देऊन सुद्धा मंदिर परिसरातील फाटक बसवण्याची हिंमत मुख्याधिकारी साहेब दाखवतील का असा प्रश्न सामान्य परळीकरांना भेडसावत आहे. याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही लोकहिताच्या मागणीकडे दुर्लक्ष मुख्याधिकारी करत आहेत असा आरोप सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केला आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र मध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर लागण्यापूर्वी या विषयासंदर्भात निवेदने मित्र मंडळाच्या वतीने असंख्य युवकांच्या साक्षीने देण्यात आली. जिल्हाधिकारी साहेबांना सुद्धा निवेदने दिली आहेत तरीसुद्धा नगरपालिकेचे मुख्याधिकारी साहेब याकडे साप दुर्लक्ष करत आहेत. मंदिर परिसरातील दक्षिणमुखी गणपती मंदिर आणि नगरपालिके समोर या संदर्भात पाच फुटाचे खड्डे खंदले आहेत मात्र लोखंडी फाटक बसविण्याची कार्यवाही होताना दिसत नाही. या खड्ड्यांमध्ये लहान मुले आणि आबाल वृद्ध नागरिक पाडण्याची भीती आहे. परळीकरांमध्ये सुद्धा याबाबत सकारात्मक प्रतिसाद आहे. लोकहिताचे कामे करण्यासाठी लोक नगरपालिकेतील प्रतिनिधींना निवडून देतात मात्र एकही प्रतिनिधी या बाबतीमध्ये बोलण्यास तयार नाही याचा अर्थ त्यांना लोकहिताचे काही देणे घेणे नाही का असा प्रश्न सामान्य परळीकरांच्या मनामध्ये आहे. या रस्त्यावरून मोठी वाहतूक आहे जड वाहनांची वाहतूक यामुळे येथे कोंडी होते. या रोड वरून जीव मुठीत धरून नागरिकांना जावे लागते त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेसाठी लोखंडी फाटक बसवणे अत्यंत गरजेचे आहे या लोकहिताच्या मागणीचा गांभीर्यपूर्वक मुख्याधिकारी साहेबांनी विचार करावा आणि त्वरित कारवाई करून फाटक बसवण्याचे काम त्वरित सुरू करावे अन्यथा नगरपालिकेसमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे.

# अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण बीड कार्यालयात संविधान दिन साजरा

## संतोष बनकर यांनी अधिकारी–कर्मचारी यांना ५० संविधानाचे केले वाटप



**बीड | प्रतिनिधी**

आज दि २६/११/२०२४ रोजी अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण बीड येथे संविधान दिवस मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. सुरुवातीला मा पल्लवी जगताप मॅडम अधीक्षक अभियंता यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर सर्व अधिकारी – कर्मचारी यांनी अभिवादन केले. त्या नंतर संतोष बनकर यांनी संविधान दिनाचे प्रास्ताविक केले. प्रस्ताविकातत व्यक्त करताना संविधानाचे महत्वाचं सांगत असताना संविधाने सर्वांना सामान न्याय व समानसंधी दिल्याने गावातील सरपंच ते देशाची राष्ट्रपती ही संविधानाच्या अधिकाराने झाली असे सांगून संविधान वाचला तरच सर्वांचे हक्क अधिकार अबाधित राहतील त्यामुळे सर्वांनी संविधान वाचन करून संविधानाचे रक्षण करण्याचे आवाहन केले.सर्व अधिकारी कर्मचारी यांनी संविधान उद्देशीकेचे सामूहिक वाचन केले.

या प्रसंगी संतोष बनकर वरिष्ठ लिपिक यांनी सर्व अधिकारी कर्मचारी यांना ५० संविधान सप्रेम भेट देऊन घराघरात संविधान जाऊन संविधानाचा अभ्यास सर्वांना व्हावा व संविधानाने दिलेले हक्क अधिकार सर्वांना कळावे हा उद्धेश व्यक्त केला. या उपक्रमा बद्दल सर्व अधिकारी कर्मचारी यांनी संतोष बनकर यांचे आभार व्यक्त केले.

या कार्यकामास एम आर शेळके उपविभागीय अभियंता, व्ही एल अडसूळ कनिष्ठ अभियंता, वाय एस राठोड कनिष्ठ अभियंता, एम एम भडांगे कनिष्ठ अभियंता,यु पी बनसोडे अधीक्षक,बी बी मुळे प्रथम लिपिक,एच जी सुरवसे वरिष्ठ लिपिक, जे बी गरुड वरिष्ठ लिपिक, आर बी सोनवणे कनिष्ठ लिपिक, एस ए यादव कनिष्ठ लिपक, मुकुंद गायकवाड कनिष्ठ लिपिक,एस यु केदार कनिष्ठ लिपिक, ए एन दाताळ कनिष्ठ लिपिक, उगले, इरफान शेख, एस एच भिसे वदका, कुरणे, देशमुख सह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

# संपादक आत्माराम वाव्हळ यांना मातृशोक

**बीड | प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील देवडी येथील मूळचे रहिवासी व सध्या बीड येथे स्थायिक असलेले साप्ताहिक संघर्ष यात्राचे संपादक श्री. आत्माराम वाव्हळ सर यांच्या आई सौ. सीताबाई पांडुरंग वाव्हळ यांचे शुक्रवार दि. २२ नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. निधना समयी त्या ६५ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पार्थिव देहावर त्यांच्या मूळ गावी देवडी ता. वडवणी येथे शनिवार दि. २३ नोव्हेंबर रोजी मोठ्या शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्र, परिवार, डॉक्टर , इंजिनिअर, वकील,शिक्षण संस्था चालक, विविध राजकीय पक्षांचे नेते कार्यकर्ते पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक सहकारी बांधव भगिनी, वृत्तपत्र क्षेत्रातील मित्र, संपादक, पत्रकार,वारकरी सांप्रदायातील महानुभव, शेतकरी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, श्री आत्माराम वाव्हळ सर यांच्या आई सौ. सीताबाई पांडुरंग वाव्हळ या गेल्या दोन महिन्यांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालय आणि बीड येथील शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. तीन मुले व दोन मुली आणि सुनांनी दोन महीन्यापेक्षा जास्त अहोरात्र सेवा केली मात्र यश आले नाही. अखेर शुक्रवार दि. २२ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ११.२० वाजण्याच्या सुमारास शासकीय रुग्णालयात दुःख निधन झाले. सौ. सीताबाई वाव्हळ यांना देवडी आणि देवडी पंचक्रोशीत 'काकू' या नावाने ओळखले जात होते. सौ. सीताबाई वाव्हळ यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मोठ्या हिंमतीने मात केली होती. त्यांचे मोठं कुटुंब होते, अतिशय गरीब परिस्थिती असताना प्रचंड मेहनत करत सर्वांचा व्यवस्थित सांभाळ केला. खूप माया लावली. त्या फार कष्टाळू व मायाळू स्वभावाच्या होत्या. त्यांनी खूप कष्ट करुन



कुटुंबातील सर्वांना उच्च शिक्षित केले. या मध्ये त्यांचा मोठा मुलगा म्हणजे श्री. आत्माराम वाव्हळ सर हे शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात कार्यरत आहेत. तसेच ते संघर्ष यात्रा या साप्ताहिकाचे संपादक आहेत. विनाअनुदानित शाळेवर नौकरी करत असताना श्री आत्माराम वाव्हळ सरांनी बीड जिल्ह्यातील नामांकित दै. झुंजार नेता वर्तमान पत्रात अनेक वर्ष उपसंपादक म्हणून काम केले आहे. श्री आत्माराम वाव्हळ सरांना अनेक आदर्श शिक्षक आणि आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आपला मुलगा मोठा पत्रकार आणि आदर्श शिक्षक झाल्याचे काकूंना खूप समाधान, कौतुक वाटत होतं. आता कुठे चांगले दिवस येत असताना अवघ्या दोन महिन्यांपासून त्या आजाराने त्रस्त होत्या. त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात आणि बीड येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचार सुरू असताना शुक्रवार दिनांक २२ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ११:२० वाजण्याच्या सुमारास त्यांचे निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. सौ.सिता काकू यांच्या अशा आकस्मिक जाण्याने वाव्हळ परिवारावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात वयोवृद्ध पती, तीन मुले, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. वाव्हळ परिवाराच्या दुःखात दै वादळ वार्ता परिवार सहभागी आहे.

# जरांगे पाटील यांच्याकडून पंडित कुटूंबियांचे सांत्वन

**गेवराई | प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील दैठण या गावातील उद्योजक सचिन पंडित यांचे वडिल कै.भैय्यासाहेब रामभाऊ पंडित यांचे दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी वयाच्या ७३ व्या वर्षी आजारपणामुळे निधन झाले. ते आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांचे स्वीय सहाय्यक सतिष शेळके यांचे मामा होत. याबाबत माहिती मिळाल्यानंतर मराठा संघर्ष योद्धे मनोज जरांगे पाटील यांनी दैठण येथे जाऊन सचिन पंडित यांची व कुटुंबीयांची सांत्वन भेट घेतली. या दुःखातून सावरण्याची ईश्वर आपणास शक्ती देवो अशी प्रार्थना नगद नारायणाचरणी मनोज जरांगे पाटील यांनी केली. यावेळी पंडित परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077